
# महाराष्ट्र क्विअर वृत्त

## जिल्हा निहाय संस्था गट व समुदाय कार्यवृत्त

अंक पहिला: एप्रिल-जून २०२२




BINDU
QUEER RIGHTS
FOUNDATION

प्रकाशक: बिंदू क्विअर राइट्स फाऊंडेशन

# महाराष्ट्र क्विअर वृत्त

**त्रैमासिक: अंक पहिला - जानेवारी ते मार्च २०२२**

प्रकाशन: मे २०२२

प्रकाशक

**बिंदू क्विअर राईट्स फाउंडेशन**

(CIN:  U85300PN2019NPL182601)

पुणे, महाराष्ट्र

BINDU
QUEER RIGHTS
FOUNDATION

# महाराष्ट्र क्विअर वृत्त

## इ-त्रैमासिक: अंक पहिला- जानेवारी ते मार्च २०२२

**Maharashtra Queer News**
**Quarterly e-magazine. Issue 1. January to March 2022.**

Publisher: Bindu Queer Rights Foundation (Pune, Maharashtra)
(CIN: U85300PN2019NPL182601)
Directors: Bindumadhav Khire, Tinesh Chopade
प्रकाशक: बिंदू क्विअर राईट्स फाउंडेशन (महाराष्ट्र ,पुणे)
संस्थापक: बिंदुमाधव खिरे, टिनेश चोपडे

प्रकाशन: मे २०२२
© बिंदू क्विअर राईट्स फाउंडेशन
संपादक: बिंदुमाधव खिरे
संपर्क: bqrf2019@gmail.com / व्हॉट्सॲप : 9763640480

All rights reserved. No part of this magazine shall be reproduced or utilized in any form in whole or in part (except for brief quotations in critical articles or reviews) by any means, including but not limited to electronic or mechanical format by photocopying, audio or video recording, or by using any information storage or retrieval system, without prior permission in writing from the publisher or author.

**Disclaimer**

The articles published in the magazine are an expression of views of the respective authors; therefore, the editor and the publisher will not be liable, in any manner, for any of the information disclosed through such articles. The views expressed through the articles shall not constitute any sort of legal assistance or opinion and shall not be used by the readers and consumers of the information in that sense.

This magazine has been prepared for general information only. It is not to be substituted for any professional or personal advice or taken as advice or to be considered as such advice. Through every effort has been made to avoid any mistake or omission, the publication is being distributed on the condition and understanding that the authors, collaborators, editors, publishers, and printers would not be liable in any manner to any person/institution by reason of any mistake or omission in this publication or for any action taken or omitted to be taken or advice rendered or accepted based on this work. All disputes are subject to the exclusive jurisdiction of Courts, Tribunals, and Forums at Pune Maharashtra.

**हे इ-मासिक बौद्धिक संपदा अधिकारांचा हक्क अबाधित ठेवून, उपरोक्त नमूद अटी/शर्तींस अधीन राहून मोफत वितरणासाठी आहे.**

## संपादकाचे दोन शब्द

गेल्या दोन दशकांहून अधिक एलजीबीटीकयूआयए (LGBTIQA) विषयांवरच मी काम करत आहे. सुरुवातीची अनेक वर्षे, एमएसएम (MSM) व तृतीयपंथी समाजात एचआयव्ही/एड्स, गुप्तरोग (STI) यांचं प्रमाण कमी व्हावं आणि भा. दं. सं. कलम ३७७ मधे बदल व्हावा या दोन महत्वाच्या मुद्यांवर, काम करण्यात गेली. महाराष्ट्रात सुरुवातीला, एलजीबीटीकयूआयए वरील जनजागृतीचे काम मोजक्या संस्थांकडून होत होतं उदा. मुंबईत  'द हमसफर ट्रस्ट', पुण्यात 'समपथिक ट्रस्ट', इत्यादी. लवकरच महाराष्ट्राच्या इतर शहरांतही हे काम होऊ लागलं.

२०१४ ला जेव्हा माननीय सर्वोच्च न्यायालयाने [NALSA विरुद्ध युनियन ऑफ इंडिया] या केसचा ऐतिहासिक निकाल दिला व तृतीयपंथीयांना स्वतःची कायदेशीर ओळख दिली. तेव्हापासून तृतीयपंथीयांच्या अधिकारां संदर्भातील /विषयीच्या कामाला मोठी गती मिळाली.

२०१८ ला माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने [नवतेजसिंग जोहर विरुद्ध आणि युनियन ऑफ इंडिया] केसचा ऐतिहासिक निकाल देत, प्रौढांमधील, संमतीने केलेले समलिंगी लैंगिक संबंध गुन्हा नाहीत हे ठणकावून सांगितलं.

या दोन महत्वाच्या निकालांमुळे, एलजीबीटीकयूआयए समाजाला आशेचा किरण दिसू लागला. आणि महाराष्ट्रातील विविध सामाजिक संस्था, गट, व्यक्ती, आपापल्या परीने या विषयावर काम करू लागल्या. आज अत्यंत कठीण परिस्थितीतही काही मोजके जण चांगलं काम करत आहेत.

अनेक प्रश्न अजूनही सुटलेले नाहीत, व विशेषकरून पुण्या-मुंबई बाहेर हे प्रश्न अधिक गंभीर स्वरूपाचे आहेत. अनेक ठिकाणी या विषयाच्या

ज्ञानाचा अभाव आहे, तज्ज्ञ डॉक्टरांचा अभाव आहे. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या सामाजिक संस्था कमी आहेत, भ्रष्टाचारी सामाजिक संस्था अनेक आहेत. अनेक ठिकाणी एलजीबीटीकयूआयए समाज स्वतःच्या समाजाचे आर्थिक, लैंगिक शोषण करतानाही दिसतोय, ही लांछनास्पद बाब आहे.

या पार्श्वभूमीवर, विविध जिल्ह्यांत काय काम चालू आहे, काय समस्या आहेत, त्यांना तांत्रिक मदत कशी देता येईल, या विचारांतून 'बिंदु क्विअर राईट्स फाऊंडेशन'ने गेल्या वर्षी 'महाराष्ट्र क्विअर नेटवर्क' या प्रकल्पाची स्थापना केली. झुमॲप द्वारे मिटिंग्स घेतल्या व या मंथनातून मराठीतले एक त्रैमासिक काढावे असे ठरले.

खर्च कमी व्हावा व वाटप सहज होईल या विचाराने या मासिकाचे स्वरूप इ-मासिक असावे असे ठरले. या मासिकाला कोणीही स्पॉन्सर नाही. देणग्यांमधून हे मासिक चालू करतोय.

हा पहिला अंक. मासिकात करमणूक, कथा, कविता नाहीत. प्रत्येक जिल्ह्यात काय काम चालू आहे याची थोडक्यात त्या त्या गटांनी दिलेली माहिती आहे, फोटो आहेत. काही लेखात इतर संस्था कशा भ्रष्ट आहेत याचा नावानिशी उल्लेख होता. हा भाग कायद्याचा विचार करून, नाईलाजाने वगळावा लागत आहे.

काही सूचना असल्यास त्या इमेल bqrf2019@gmail.com वर जरूर कळवा .

**विशेष नोंद : महाराष्ट्रातील काही जिल्हे असे आहेत, की जिथे काम चालू आहे पण तेथील संस्था, गटांनी त्यांच्या कार्याची माहिती दिली नाही. ज्यांनी माहिती पाठविली ती देत आहोत.**

**बिंदुमाधव खिरे**

## आभार


हे ई-मासिक काढण्यास अनेकांचा मोलाचा हातभार लाभला आहे. त्यांची नावे खाली देत आहोत. या सर्वांचे मनापासून आभार.

**अहमदनगर:**डॉ. गिरीष कुलकर्णी (संस्थापक 'स्नेहालय संस्था'), निखील समर्थ.

**चंद्रपूर:** राज कचोले (प्रकल्प संचालक, 'संबोधन ट्रस्ट')

**मुंबई:** अशोक राव कवी

**नंदुरबार:** विजया वसावे, महेश्वरी ठाकरे ('नवचैतन्य सामाजिक संस्था')

**नाशिक:** डॉ. अभिजित कोरेगावकर (मानसोपचारतज्ज्ञ)

**परभणी:** अमिता (तृतीयपंथी कार्यकर्ती)

**पुणे:** अनिल उकरंडे (गट नेता 'युतक'), लखन गुरु ('श्री महालक्ष्मी सामजिक संस्था', धानोरी), प्रसाद गोंदकर ('पुणेरी प्राईड फाऊंडेशन')

**सोलापूर:** सीमा किणीकर मॅडम (संस्थापिका, संचालिका 'निरामय आरोग्य धाम'), शिवाजी शिंदे (प्रकल्प संचालक), प्रदीप पाटील (पिअर एज्युकेटर )

**वाशीम:** नागेश मधेशी (ICTC Counselor: एचआयव्ही/एड्स समुपदेशक)

- ओंकार शिंदे, राहुल शिंदे व दिगंबर बिराजदार यांनी मराठी टायपिंग करण्यास मोलाची मदत केली.

- अशोक राव कवी यांच्या लेखाचे मराठी भाषांतर व मासिकाच्या लेखनाचे मुद्रित शोधनाचे काम अनुपमा पाठक यांनी केले.

- अमोल शिंदे यांनी नियोजनास मदत केली.

- मासिकाची मुखपृष्ठ व मांडणी चंद्रशेखर बेगमपुरे यांनी केली.

- एका गे पुरुषाने या इ-मासिकांसाठी आर्थिक मदत केली. त्याने त्याचे नाव जाहीर करू नये अशी विनंती केली आहे. त्याचे मनापासून आभार.

- ऍडव्होकेट आशिष सोनावणे यांनी कायदेविषयक मोलाचे मार्गदर्शन केले.

- इतरही काही जणांनी मदत केली, पण त्यांनी त्यांची नावं जाहीर करू नयेत अशी विनंती केली. त्यांची नावं देत नसलो तरी त्यांचेही मनापासून आभार.

## अनुक्रमणिका


| जिल्हा | माहिती/कार्य | लेखक | पान क्र. |
|---|---|---|---|
| अहमदनगर | स्नेहालय चे कार्य | निखिल समर्थ | 10 |
| अकोला | | | --- |
| अमरावती | | | --- |
| औरंगाबाद | | | --- |
| बीड | | | --- |
| भंडारा | | | --- |
| बुलढाणा | | | --- |
| चंद्रपूर | संबोधन संस्थेचे कार्य | राज कचोले | 14 |
| धुळे | | | --- |
| गडचिरोली | | | --- |
| गोंदिया | | | --- |
| हिंगोली | | | --- |
| जळगाव | | | --- |
| जालना | | | --- |
| कोल्हापूर | अभिमान गटाची माहिती | विशाल पिंजानी | 16 |
| लातूर | | | --- |
| मुंबई | लेख | अशोक राव कवी | 17 |
| नागपूर | | | --- |
| नांदेड | | | --- |
| नंदुरबार | अनुभवकथन | विजया वसावे | 21 |
| | नवचैतन्य संस्थेचे कार्य | माहेश्वरी ठाकरे | 23 |
| नाशिक | SEXICON परिषदेतील चर्चासत्र | बिंदुमाधव खिरे | 26 |


| | | | |
|---|---|---|---|
| उस्मानाबाद | | | --- |
| पालघर | | | --- |
| परभणी | कार्य | अमिता | 28 |
| पुणे | माननीय सुप्रियाताई सुळे यांचे आभार | बिंदुमाधव खिरे | 30 |
| | बिंदू क्किअर राईट्स फाऊंडेशन चे कार्य | | |
| | बिंदुमाधव खिरे | 32 | |
| | युतक गटाचे कार्य | अनिल उकरंडे | 35 |
| | श्री महालक्ष्मी सामाजिक संस्थेचे कार्य | लखन गुरु | 41 |
| | पुणेरी प्राईड फाऊंडेशन कार्य | प्रसाद गोंदकर | 44 |
| ------- | ब्रिजस्टोन टायर्सची ड्रायव्हिंग प्रशिक्षण जाहिरात | | 46 |
| रायगड | | | --- |
| रत्नागिरी | | | --- |
| सांगली | अनुभवकथन | अजित, | |
| | | राहुल शिंदे | 47 |
| सातारा | युतक गटाचे कार्य | अनिल उकरंडे | 49 |
| सिंधुदुर्ग | | | --- |
| सोलापूर | निरामय आरोग्य धामचे कार्य | शिवाजी शिंदे, | |
| | | प्रदीप पाटील | 50 |
| ठाणे | | | --- |
| वर्धा | NMCची LGBT विषयासंदर्भातील तज्ज्ञ समिती | | |
| | | बिंदुमाधव खिरे | 55 |
| वाशिम | | | --- |
| यवतमाळ | | | --- |

# जिल्हा: अहमदनगर

## स्नेहालय संस्था

स्नेहालय LGBTQ संपर्क परवेज आत्तार. संपर्क क्रमांक: 9561509366

लेखक: निखिल समर्थ
निखिल समर्थ श्रीरामपूर, जि. अहमदनगर, इथला रहिवासी असून अहमदनगर जिल्ह्यातील समलिंगी व्यक्तींना मदत करण्याचं कार्य करतो.
संपर्क क्रमांक: 8459353796
ई-मेल: nikhilsamarth123@gmail.com



स्नेहालय (अहमदनगर) संस्थेचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी

## माहिती व कार्य

मी स्नेहालय (अहमदनगर) संस्थेला भेट देऊन संस्थेचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी यांच्याकडून  संस्थेच्या कार्याबद्दल माहिती घेतली.

स्नेहालयला ‘Home of Love’ असंही म्हटलं जातं. म्हणजे प्रेम, वात्सल्य, माया आणि ममता असलेले घर. स्नेहालयची स्थापना डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी 1989 साली अहमदनगर येथे केली. HIV संसर्गित, मानवी तस्करी, लैंगिक अत्याचाराला बळी पडलेले अशांना आधार देण्यासाठी स्नेहालय संस्थेची स्थापन केली गेली.

शरीर विक्री करणाऱ्या महिलांना व त्यांच्या मुलांना उत्तम शिक्षण देऊन त्यांचं जीवन घडवण्यापासून सुरुवात झाली. HIV सारख्या आजारापासून कसा बचाव करता येईल याची काळजी घेण्याविषयी मार्गदर्शन करण्यास सुरुवात केली. ज्या HIV संसर्गित व्यक्तींना घरातून, समाजातून बहिष्कृत केलं गेलं त्यांना निवारा आणि उपजिविकेचं साधन संस्थेकडून देण्यात आलं. HIV संसर्गित आई-वडिलांकडून जी HIV संसर्गित मुले जन्माला आली त्यांना निवारा, शिक्षण आणि ARTचे औषधोपचार संस्थेकडून केले जातात.

डॉ. गिरीश कुलकर्णी यांच्याशी बोलताना त्यांनी सांगितलं, की “आज स्नेहालय फक्त अहमदनगर येथेच नाही तर श्रीरामपूर आणि इतर जिल्ह्यात सुद्धा आहे. त्याचबरोबर अमेरिका आणि UK मध्ये ही आहे".

असे कार्य करत असताना डॉ. गिरीश कुलकर्णी यांच्या लक्षात आलं की अनेक तृतीयपंथी आणि कोती शरीर विक्री व्यवसाय करतात. स्नेहालयच्या ‘स्नेहज्योत’ प्रकल्पाचे दीपक म्हणाले की, “MSM” (पुरुषांबरोबर शरीर संबंध करणारे पुरुष) साठी स्नेहालय कडून 2003 साली ‘स्नेहज्योत’ प्रकल्प सुरु करण्यात आला. ह्यात सुरक्षित शारीरिक संबंध ठेवण्याबाबत मार्गदर्शन केले जाते. वेळोवेळी HIV टेस्टिंग करण्यासाठी सुद्धा सांगितलं जातं. कम्युनिटी मधील HIV संसर्गित व्यक्तींना ARTC सोबत 'लिंक' करून दिले जाते.

तृतीयपंथियांना शिक्षण घेण्यास आणि नोकरी किंवा व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिलं जातं.”

श्रीरामपूर मधील स्नेहालयचे श्री दीपक वर्मा यांनी सांगितलं की, “कोरोना महामारी काळात  लॉकडाऊन असताना अनेक तृतीयपंथी आणि MSM Sex Workers यांना स्नेहालय ह्या संस्थेकडून आर्थिक मदत मिळाली. सोबत जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. काही MSM लाभार्थी म्हणतात की स्नेहालय हेच आमचे घर आहे”.

जर एखाद्या 18 वर्षांवरील समलिंगी व्यक्तीला त्याचं घर सोडावं लागलं किंवा कुटुंबियांनी घरातून काढलं असेल तर निराधार झालेल्या आपल्या कम्युनिटी सदस्याला तात्पुरता निवारा आणि अन्न पुरविले जाते. त्यानंतर त्याला स्वतःच्या पायावर उभं राहण्यास मदत केली जाते. कम्युनिटी मधील व्यक्तींना समुपदेशन करण्याची व्यवस्था सुद्धा आहे. बऱ्याच वेळा कम्युनिटी मधील लोक डिप्रेशनमध्ये जातात. तर अशांना मानसोपचारतज्ज्ञांकडून समुपदेशन दिले जाते.

संकटात असणाऱ्या बालकांसाठी चाइल्ड-लाइन, निराधार मुलांना आश्रय देण्यासाठी पुनर्वसन केंद्र, बेवारस नवजात बालकांसाठी ‘स्नेहांकुर’ अनाथालय, पीडित निराधार महिलांसाठी ‘स्नेहाधार’ आश्रम, निराधार,  बहिष्कृत HIV संसर्गित व्यक्तींना आश्रय देण्यास आणि उपजीविकेसाठी संस्थेच्याच 25 एकर जमीनीवर शेतीमध्ये काम  दिले जाते.

स्नेहायलचाच  रेडिओ नगर 90.4 FM  सुद्धा आहे. मी जेव्हा स्नेहालय मध्ये माहिती घेण्यास गेलो  तेव्हा  डॉ गिरीश  कुलकर्णी  यांनी मला रेडिओ  नगर  FM वर  बोलण्यास  आमंत्रण  दिले.

'बिंदू क्विअर राईट्स फाऊंडेशन'चा उपक्रम आणि कार्याबद्दल माहिती देण्यास मला रेडिओवर बोलण्यास सांगितलं गेलं. कुठलीही तयारी नसताना अचानक प्रथमच रेडिओवर बोलणार असल्याने सुरुवातीला मी थोडा नर्व्हस होतो पण नंतर छान रेकॉर्डिंग. झालं. 31 मार्च रोजी सकाळी 7-1 ह्या वेळेत माझी मुलाखत प्रसारित करण्यात आली.

स्नेहालयच्या ह्या कार्यास बिंदू क्विअर राईट्स फाऊंडेशन' परिवार कडून खूप खूप शुभेच्छा !!!

# जिल्हा: चंद्रपूर

## संबोधन ट्रस्ट

### संपर्क

प्रकल्प संचालक: राज कचोले
संपर्क क्रमांक: 9834503046 / 9049232252
ई-मेल: sambhodhan@gmail.com

### माहिती व कार्य

संबोधन ट्रस्ट (चंद्रपूर) ही संस्था मागील दहा वर्षांपासून MSM/TG समाजासाठी कार्य करीत आहे. आरोग्य व चांगले सुदृढ जीवन कशा पद्धतीने जगावे यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. संबोधन ट्रस्ट या संस्थेत एकूण १२७४ सदस्य आहेत. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थे कडून प्रकल्पला आर्थिक मदत मिळते.

आमच्या संस्थेमार्फत MSM/TG समाजाच्या आरोग्याची काळजी घेतली जाते. दर ६ महिन्यांनी या गटाची एच.आय.व्ही. तपासणी केली जाते. त्याचबरोबर दर तीन महिन्यांनी  गुप्त आजारांची तपासणी केली जाते. क्षयरोग व सिफिलीस या सारख्या आजारांची वेळोवेळी तपासणी केली जाते. एच.आय.व्ही./एड्सबद्दल जनजागृतीचे कार्यक्रम घेतले जातात.

या सोबत आधार कार्ड, राशन कार्ड, पॅन कार्ड, बँकेचे खाते, तृतीयपंथी सर्टिफिकेट, ड्रायव्हींग लायसन्स इत्यादी आवश्यक कागदपत्रे मिळविण्यास मदत केली जाते. LGBTQ समुदायावर काही अन्याय होत असेल तर संबोधन ट्रस्ट ही संस्था वेळो वेळी त्यांना मदत करते. बऱ्याच वेळेस समाजाकडून व स्वत:च्या परिवाराकडून या गटाचा छळ होतो. हा छळ  थांबावा म्हणून संस्थेमार्फत एका गटाची निर्मिती केली गेली आहे जो MSM/TG समुदायाला  मदत करतो. अशा प्रकारचे कार्य संबोधन ट्रस्ट मागील दहा वर्षांपासून सातत्याने करीत आहे.




कार्यक्रमास उपस्थित जन




संबोधन संस्थेचा स्टाफ

# जिल्हा: कोल्हापूर

## अभिमान गट

### माहिती व कार्य

‘अभिमान’ हा कोल्हापूर शहरातील गट आहे जो LGBTQIA+ समुदायाचे सक्षमीकरण करण्याचे काम करतो. आपली लैंगिकता/लिंगभावाशी संघर्ष करत असलेल्या लोकांना भावनिक आधार देतो. या गटाची स्थापना समविचारी समुदाय सदस्यांच्या गटाने केली आहे.

अभिमानशी कनेक्ट होण्यासाठी त्यांच्या फेसबुक किंवा व्हॉट्सअॅप पेजला (“अभिमान कोल्हापूर”) फॉलो करा.

### संपर्क:

संपर्क क्रमांक / व्हॉट्सअॅप: 9922295522
ई-मेल: abhimaan.kolhapur@gmail.com



# जिल्हा: मुंबई

## LGBT चळवळीची सध्याची स्थिती

लेखक: इंग्रजी लेखाचे लेखक: अशोक राव कवी (भारताचे पहिले एलजीबीटीकयूआयए (LGBTIQA) ॲक्टीव्हिस्ट).
मूळ इंग्रजी लेखाचा मराठी अनुवाद: अनुपमा पाठक

सर्वोच्च न्यायालयाने २०१८ साली दिलेल्या महत्वपूर्ण निकालानंतर आपण एजलीबीटी चळवळीत नेमके कुठे आहोत?

एजलीबीटीक्यू जगाकडे नजर टाकली तर आपल्याला जे भकास, उजाड चित्र दिसते ते स्विकारावंच लागेल. चळवळीचं वास्तव निराशाजनक आहे असं दिसतं.

किंवा कदाचित असं तर नाही ना की तिथे अशी काही घुसळण चालू आहे जी आपल्या नजरेतून निसटली आहे?

असे अनेक प्रश्न समोर उभे राहतात. ज्यांची कोणतीही ठाम उत्तरं आपल्याकडे नाहीत. याचं साधं कारण म्हणजे, दखल घ्यावी असं काही चळवळीत घडतच नाहीए!

याचं एक कारण असू शकतं की चळवळीचे जे अनेक तुकडे पडले आहेत ते जोडण्याच्या पलीकडे गेले आहेत. चळवळीत पडलेली ही फूट सांधणं अशक्य आहे.

अजून एक कारण, जे जास्त अचूक असू शकतं ते म्हणजे कार्यकर्ते चळवळीची कधीही न संपणारी कंटाळवाणी कामे करत राहतात. आणि मग किती काम झालं, कोणतं काम चालू आहे याच्या नोंदी करणे राहून जाते.

मला जे काही पहायला मिळतं आहे त्या वरुन मी असं म्हणू शकतो की, आपल्या चळवळीला पुढे नेण्यासाठी कोणतेही विशेष कष्ट घेतले जात नाहीत. याला बिंदुमाधव (पुणे) आणि पवन (कोलकत्ता) यांच्या सारख्या काही मोजक्या कार्यकर्त्यांचा अपवाद आहे. हे काही जण आपल्या कामाचं दस्तऐवजीकरण करून ते प्रकाशित करतात किंवा इंटरनेटवर प्रसिद्ध करतात.

आपण अशा कार्यकर्त्यांच्या कामाचा पाठपुरावा करून त्यांचे अनुभव, त्यांनी केलेले काम एकत्रित करायला हवे. असं काम करणारी एकमेव क्विअर स्त्री म्हणजे शोभना कुमार. ती तिच्या 'क्विअर इंक' या प्रकाशन संस्थेमार्फत एलजीबीटीक्युए समुहातील व्यक्तींचे लिखाण प्रकाशित करते व संकलित करते.

पुढे जाण्याआधी मला, मी केलेल्या चुकांमधील सर्वांत मोठी चूक इथे कबूल करायची आहे. मी सर्वात पहिलं 'पुरुष लैंगिक आरोग्य केंद्र' स्थापन केलं आणि त्यासाठी महानगरपालिकेची जागा मिळवली. यामुळे मी चळवळीचं 'एनजीओकरण' केलं.

समलिंगी आणि उभयलिंगी स्त्रिया या बाबतीत अधिक हुशारीने वागल्या. त्यांनी स्वतंत्रपणे स्वत:च्या कोणत्याही संस्थेची नोंदणी न करता बचत गटांच्या आडून आपले काम चालू ठेवले. त्यामुळे त्या शासनाच्या चौकटीत न येता, शासकीय यंत्रणांच्या देखरेखीत न अडकता आपलं काम मोकळेपणाने करू शकल्या. याचबरोबर त्यांनी एलजीबीटीक्यू मुद्यांवर थेट काम करण्याआधी स्त्रीवादी मुद्यांवर काम करायला सुरुवात केली. यामुळे त्यांच्या स्वतंत्र कामाची नोंद झाली नसली तरी व्यापक मुद्यांवर त्यांचा प्रभाव पडला. उदा. अत्याचार/बलात्काराच्या प्रश्नावर चा जस्टीस वर्मा कमिटी अहवाल.

पण २०१८ साली सर्वोच्च न्यायालयाने ३७७ कलम रद्द केले आणि एलजीबीटीक्यूए+ मुद्यांवर काम करणाऱ्या संस्था व संघटनांच्या कामाचा केंद्रबिंदूच हलला. आणि काळजीची गोष्ट म्हणजे, या काळात टि.बी., एच.आय.व्ही या सारखे आजार ठाण मांडून बसले आहेत. याच विषयांवर प्रामाणिकपणे 'फिल्डवर' काम नको का व्हायला त्यात भर म्हणून कोविडची साथ आहेच. तिची हि तिसरी का चौथी लाट?

या पार्श्वभूमीवर मी बिंदूमाधव आणि पवन यांचे कौतुक करतो की ते कायम एलजीबीक़्यूए+ समुदायाच्या मुद्यांचा सातत्याने पाठपुरावा करत आहेत. एलजीबीटी समुदायाला रोजच्या आयुष्यात भेडसावणाऱ्या सर्व समस्यांना समर्थपणे तोंड देता यावे यासाठी या समाजाचे सक्षमीकरण करण्यावर या दोघांचा भर असतो. स्वत:चे प्रश्न सोडवण्यासाठी स्वत:च स्वत:ला मदत करणं हा सर्वात चांगला उपाय असतो. स्वत: सक्षम होणे आणि समुदायाला सक्षम करणे यासाठी कोणत्याही आंतरराष्ट्रीय संस्थेकडून 'प्रशासकीय खर्च' या नावाखाली पैसे आणून पॉश ऑफिसे चालवावी लागत नाहीत.

आपल्या ज्या खऱ्या समस्या आहेत, उदाहरणार्थ- समलैंगिक विवाहास मान्यता नसणे, या समाजात सन्मानाने, समानतेने एक नागरिक म्हणून जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष, आपल्या लिंगभाव ओळखीनुसार कायदेशीर ओळखपत्रे मिळण्यात येणारे अडथळे या सारख्या समस्या सोडवण्यासाठी एजलीबीटी समुदायातील प्रत्येक व्यक्तीने सक्षम व्हावं यासाठी असे कार्यकर्ते सतत कार्यरत असतात.

माझी सर्व मदार अशा कष्टाळू लोकांवर आहे- ते एलजीबीटीक्यूए+ समुदायातील असतील किंवा त्यांना मदत करणाऱ्या संस्था, Allies असतील. ज्या-ज्या लोकांनी एजलीबीटीक्यूए प्रश्नांवर/मुद्यांवर

काम करण्यासाठी स्वत:चा वेळ, परिश्रम दिले आहेत, देत आहेत अशा लोकांवर माझी सगळी भिस्त आहे.

मी इथे जरी फक्त बिंदूमाधव आणि पवन यांचे नाव घेतले असले तरी मला खात्री आहे की यांच्या सारखेच अजूनही काही एकांडे शिलेदार असेच चांगले काम करत असणार. आता प्रश्न हा आहे की त्यांना आपले काम अधिक चांगल्या प्रकारे करता यावे यासाठी अर्थसहाय्य कसे मिळवून देता येईल.




अशोक राव कवी (भारताचे पहिले एलजीबीटीकयूआयए (LGBTIQA) ॲक्टीव्हिस्ट)

# जिल्हा: नंदूरबार

## अनुभवकथन

लेखिका: ट्रान्सवुमन विजया वसावे (Masters in Social Work)

नमस्कार मी वसावे विजया. मला नुकतेच सातपुडातील पहिले ट्रान्सजेंडर सर्टिफिकेट जिल्हाधिकाऱ्यांकडून मिळाले आणि पहिली ट्रान्सजेंडर म्हणून नंदूरबार जिल्ह्यातील शासन दरबारी माझी नोंद झाली.

सुरुवातीला ट्रान्सजेंडर सर्टिफिकेटच्या चौकशीसाठी नंदूरबार मधल्या समाज कल्याण ऑफिस मध्ये मी गेली असता ऑफिस मधल्या लोकांना खूप नवल वाटले, कारण आजपर्यंत कोणीही ट्रान्सजेंडर सर्टिफिकेटसाठी चौकशी करण्यासाठी त्यांच्याकडे आले नव्हते. ऑफिस मधल्या लोकांनी माझा खूप आदर केला आणि या धावत्या भेटीमधे LGBTIQA+ प्राथमिक ओळख माझ्याकडून जाणुन घेतली. मी त्यांना साध्या भाषेत ट्रान्सजेंडर व्यक्ती म्हणजे काय? हे समजून सांगितले. त्यांना उच्च शिक्षण घेतलेली ट्रान्सजेंडर व्यक्ती आपल्या जिल्ह्यात आहे हे माहिती नव्हते. (मी पुण्याच्या 'कर्वे इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क' मधे MSW केले आहे आणि आता 'नेशनल एडस रिसर्च इन्स्टिट्यूट' मधे PrEP च्या एका संशोधन प्रकल्पात 'पीअर एज्युकेटर' म्हणून काम करते.) जिल्ह्याच्या 'तृतीयपंथी कल्याण समिती' साठी ते ट्रान्सवुमन शोधत होते तेव्हा देखील त्यांना कोणी ट्रान्सवुमन नंदूरबार जिल्ह्यातून भेटली नव्हती. मी त्यांच्या ऑफिस मध्ये गेले तेव्हा त्यांना पाहिल्यांदा ट्रान्सवुमनशी बोलण्याचा अनुभव आला.

मी सातपुडातल्या माझ्या गावात गेले म्हणजे खूप कुतूहलाचा विषय ठरते कारण त्यांनी सातपुडयात स्वतःची ओळख जाहीर केलेली ट्रान्सजेंडर व्यक्ती कधीही बघितली नाही. मी दिसले की मला बघण्यासाठी लोक एकत्र जमतात. माझ्या परिचयाच्या व्यक्ती सोडल्या

तर इतर अनोळखी व्यक्ती मला बघतात तेव्हा मी ट्रान्सवुमन आहे हे त्यांना कळून  येत नाही. जेव्हा मी माझ्याबद्दल सांगते तेव्हा ते खूप आश्चर्यचकित होतात. त्यांना  इकडून तिकडून माहिती मिळाली  की ‘हा अगोदर मुलगा होता व आता मुलगी झाली आहे’ की हे त्यांच्या कल्पनेपलीकडचे असते. हे कसे होऊ शकते? खास करून मी महिलांच्या आकर्षणाचा  विषय ठरते. मला जेवढा वेळ देता येईल त्या पद्धतीने LGBTIQA+ ह्या विषयी मी नवीन पिढीतील मुला-मुलींशी संवाद साधते. तरूण-तरूणींना LGBTIQA+ बद्दलची माहिती झाली तर खूप महत्वाचे सकारात्मक वातावरण तयार होईल.

मी ही माहिती  सांगताना तेथील बोलीभाषेत भिल्लोरी संवाद साधते. त्यामुळे त्यांना खूपच आपलीशी वाटते. कारण आजकाल शिकलेले लोक गावाकडची भाषा विसरून मराठी/हिंदी बोलतात. पण, स्थानिक बोलीभाषा बोलली तर संवाद जास्तीत जास्त चांगला होतो. कारण आपण समोरच्या लोकांना एखादी गोष्ट कशा पद्धतीने समजून सांगतो त्यावर लोकांचे विचार अवलंबून असतात.

शेवटी एक गोष्ट मला आवर्जुन सांगायची आहे. माझा स्वीकार करण्यात माझ्या न शिकलेल्या काकूचा सुद्धा मोठा हातभार आहे. जे कोणी माझ्याबद्दल विचारतात त्यांना, मोठमोठ्या लोकांना लाजवेल अशा खूप मजेशीर पद्धतीने त्या समजावून सांगतात.



LGBTIQA+ च्या सत्रासाठी जमलेल्या गावातील
मुली व सोशल वर्कच्या विद्यार्थिनी. विजया मध्यभागी उभी आहे

# जिल्हा: नंदूरबार

## नवचैतन्य फाऊंडेशन

महेश गव्हाले (CBO) अध्यक्ष, राजु ठाकरे (संस्था) अध्यक्ष

## संपर्क

संपर्क क्रमांक: 9922593837, 9637165372
ई-मेल: ncfnandurbar@gmail.com
लेखक: माहेश्वरी ठाकरे

## माहिती

नंदुरबार जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती: जुलै १९९८ रोजी धुळे जिल्ह्याचे विभाजन झाले व नंदुरबार जिल्ह्याची निर्मिती झाली. नंदुरबार जिल्ह्याची लोकसंख्या १६,४८,२९५ आहे. उत्तरेकडे गुजरात राज्य आहे. उत्तर आणि उत्तर पूर्वेला मध्यप्रदेश राज्य आहे. जिल्ह्यात एकूण सहा तालुके आहेत व नंदुरबार आदिवासी जिल्हा आहे. तसेच जिल्ह्यात साक्षरतेचा अभाव आहे.नंदुरबार जिल्ह्यात समलिंगीसंबंध ठेवणारे लाभार्थी अंदाजे ४००-४५० आहेत. तृतीयपंथी लाभार्थी जिल्ह्यात अंदाजे १५-२० आहेत.

तृतीयपंथी लाभार्थी नंदुरबार मध्ये आठवडे बाजार व रेल्वे येथे मंगती करतात. दुसऱ्या कोणत्याही प्रकारची त्यांना सहाय्यता मिळत नाही. त्यांच्याकडे बघण्याचा लोकांचा दृष्टीकोन वेगळा असतो. काही MSM लाभार्थी सोंगड्या-पार्टीकला (पुरुषाने स्त्री वेशात नाचणे) नृत्य सादर करून आपला उदरनिर्वाह करीत असतात.

‘नवचैतन्य फाऊंडेशन’ व ‘विघ्नहर्ता सेवाभावी बहुउद्देशीय संस्था’ आपल्या तृतीयपंथी समुदायातील लाभार्थ्यांसाठी काम करण्यात अग्रेसर असते.

## जानेवारी ते मार्च २०२२ मधील कार्य

नवचैतन्य फाऊंडेशन (CBO) अंतर्गत जिल्ह्यात एकूण १५ लाभार्थ्यांना तृतीयपंथी प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

समाजकल्याण विभागा अंतर्गत तृतीयपंथी संरक्षण व कल्याणकारी योजना यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे. मा. जिल्हाधिकारी सौ. मनिषा खत्री समितीच्या अध्यक्ष आहेत.

या समितीच्या आधारे २१ मार्च २०२२ ला एक दिवसीय तृतीयपंथी स्वयंरोजगार प्रशिक्षण शिबीर भरवण्यात आले. आम्ही जिल्हाधिकारी मॅडमकडून लाभार्थ्यांसाठी घरकुल, शिलाई मशिन, कर्ज उपलब्ध करण्याची मागणी केली आहे. तसेच लाभार्थ्यांना एकत्र राहण्यासाठी जागेची मागणी केली असून त्यांचा एक परिवार तयार करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

लोक अदालतचे जिल्हा सचिव डि. वाय हरणे साहेब यांच्यासोबत कायदे विषयक मिटींग घेण्यात येते. वेळोवेळी वकील मॅडम कडून मदत होत असते. तसंच जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडून आरोग्यविषयक शिबीरासाठी मदत केली जाते.




जिल्हाधिकारी मा.सौ.मनिषा खत्री मॅडम, पोलीस अधीक्षक महेंद्र पंडीत. नंदुरबार येथील समाजकल्याण विभागाअंतर्गत समिती स्थापन करण्यात आली. मिटींगमध्ये मॅडम लाभार्थ्यांच्या अडचणी समजून घेत आहेत.



लोक अदालत जिल्हा सचिव मा. डि.वाय. हरणे यांच्यासोबत
कायदेविषयक समस्या सोडवण्याबाबत मीटिंग




तृतीयपंथी स्वयंरोजगार प्रशिक्षण शिबीर
समाज कल्याण आयुक्त, CBO,संस्था प्रमुख,लाभार्थी





दिनांक 21 मार्च 2022. तृतीयपंथी स्वयंरोजगार प्रशिक्षण शिबीर

# जिल्हा: नाशिक

लेखक: बिंदुमाधव खिरे

दिनांक २६ व २७ फेब्रुवारीला 'इंडियन मेडिकल असोसिएशन' (नाशिक) ने "SEXICON" परिषद आयोजित केली होती. या दोन दिवसात अनेक चर्चासत्रं झाली. यात दोन सत्र LGBTIQA संबंधित होती.

२६ फेब्रुवारीला लिंग-भावावर - "Gender Dysphoria to Euphoria" हे चर्चासत्र आयोजित केलं होतं. या चर्चासत्रात मुंबईचे मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अरमान पांडे, पुण्याच्या एन्डोक्रायनॉलॉजिस्ट डॉ. सजल कामत व दिल्लीचे फोर्टिस हॉस्पिटलचे प्लास्टिक सर्जन डॉ. रिची गुप्ता यांनी भाग घेतला. या सर्वांनी- 'जेन्डर डिसफोरिया' (Gender Dysphoria (GD)) चं प्रमाणपत्र देणं, लिंग-बदल करू इच्छिणाऱ्या ट्रान्स-व्यक्तींनी संप्रेरक घेणं, लिंग-परिवर्तन शास्त्रक्रियेबद्दल सखोल माहिती दिली.



२७ फेब्रुवारीला “Towards LGBT Inclusion” हे चर्चासत्र आयोजित केलं गेलं. या चर्चासत्रात पुण्याच्या भारती हॉस्पिटलच्या मानसोपचार विभागाच्या प्रमुख डॉ. ज्योती शेट्टी, बाल व तरुण मुला-मुलींबरोबर काम करणारे मानसोपचारतज्ज्ञ डॉ. भूषण शुक्ल, भारती हॉस्पिटल (पुणे) व के.इ.एम हॉस्पिटल (पुणे) येथील मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अरविंद पंचनदीकर व पुण्याचे LGBTIQA+ अॅक्टीव्हिस्ट बिंदुमाधव खिरे यांनी भाग घेतला. नाशिकचे बाल व तरुण मुला-मुलींबरोबर काम करणारे मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अभिजित कोरेगावकर यांनी सूत्र संचालन केलं.

# जिल्हा: परभणी

लेखिका: तृतीयपंथी समाजसेविका अमिता

## कार्य

करोना काळात 309 LGBT समुदायाला पैसे व राशन किट मदत केल्यामुळे महिला दिनाच्या दिवशी- ७ महिला व मी एक तृतीयपंथी महिला म्हणून ‘होमिओपॅथिक अकादमी अँड रिसर्च सेन्टर’ (HARC) आणि ‘स्टुडंट्स असोसिएशन ऑफ मायक्रोबायलॉजिस्टस’ (SAM) तर्फे सनमान पत्र देऊन सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम DSM कॉलेज व डॉ चांडक यांनी आयोजित केला होता.

परभणी जिल्ह्यातील 5 तृतीयपंथींना आणि 10 MSM (पुरुषांबरोबर शरीर संबंध ठेवणारे पुरुष) ना राशन कार्ड व मतदान कार्ड मिळवून दिले व हे काम पुढे चालू आहे.



महिला दिनाच्या दिवशी ७ महिला व तृतीयपंथी अमिताचा HARC आणि SAM तर्फे सत्कार




जिल्हा विधि सेवा प्राधिकरण सोबत मिटींग: खूप दिवसांच्या मेहेनतीला यश आले.

# जिल्हा: पुणे

## माननीय खासदार सुप्रियाताई सुळे यांचे मनापासून आभार !

लेखक: बिंदुमाधव खिरे

२०१८ ला माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने [नवतेजसिंग जोहर विरुद्ध युनियन ऑफ इंडिया] या केसचा ऐतिहासिक निकाल देत, प्रौढांमधील, संमतीने केलेले समलिंगी लैंगिक संबंध गुन्हा नाहीत हे ठणकावून सांगितलं. त्यानंतर LGBTIQA चळवळीचा पुढचा टप्पा म्हणजे समलिंगी विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवणे.

गेल्या ३-४ वर्षात, समलिंगी विवाहाला कायद्याने मान्यता मिळावी हा जोर वाढू लागला आहे. विशेष विवाह कायदा (Special marriage Act, 1954) जो धर्म निरपेक्ष कायदा आहे, हिंदू विवाह कायदा (The Hindu Marriage At, 1955) व परदेशी विवाह कायदा (Foreign Marriage Act, 1954) हे कायदे समलिंगी विवाहाला मान्यता देत नाहीत. हा समलिंगी लैंगिक कलाबाबत उघडपणे केलेला भेदभाव आहे. असा भेदभाव करणे हे मूलभूत अधिकारांचे उल्लंघन आहे, असा युक्तिवाद करत सुरुवातीला एक याचिका केरळ उच्च न्यायालयात व नंतर अनेक याचिका दिल्ली उच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या. दिल्ली उच्च न्यायालयात या याचिकांची सुनावणी वेगाने चालू आहे, व पुढील कोर्टाची तारीख १७ मे २०२२ ही आहे.

या पार्श्वभूमीवर बारामती (जिल्हा पुणे) च्या माननीय खासदार सुप्रियाताई सुळे (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष- NCP) यांनी:

विशेष विवाह कायदयात (Special marriage Act, 1954) बदल सुचवून समलिंगी विवाहाला मान्यता मिळावी असे खाजगी विधेयक संसदेत मांडले आहे. त्यांचे मनापासून खूप खूप आभार !



माननीय खासदार सुप्रियाताई सुळे

DMK पक्षाच्या Dr. डीएनव्ही सेंथील कुमार एस, (तामिळनाडू) यांनी 'Equal Protection of Rights for LGBTIQA Persons Bill 2021' हे समलिंगी विवाह, समलिंनी जोडप्यांनी मूल दत्तक घेणं, इत्यादी सर्वसमावेशक विधेयक संसदेत मांडले आहे. त्यांचे विशेष आभार!

# जिल्हा: पुणे

## बिंदू क्विअर राईट्स फाऊंडेशन

संस्थापक: बिंदुमाधव खिरे, टिनेश चोपडे

लेखक: बिंदुमाधव खिरे

## संपर्क

ई-मेल: bqrf2019@gmail.com
व्हॉट्सॲप : 9763640480
वेबसाईट: http://www.binduqueerrights.org

## माहिती

बिंदुमाधव खिरे एलजीबीटीआयकयूए+ॲक्टीव्हिस्ट आहेत. ते स्वतः गे आहेत. ते दोन दशकांहून अधिक काळ या विषयावर काम करत आहेत. त्यांनी या विषयांवर १२ पुस्तके (मराठी व इंग्रजी) लिहिली/संपादित केली आहेत. त्यांनी पुणे जिल्ह्यात २०११ साली पहिली एलजीबीटीआयकयूए+ अभिमान पदयात्रा काढली. त्यांनी २००२ मध्ये समपथिक ट्रस्ट (इ ३६६२, पुणे) ही संस्था एलजीबीटीआयकयूए+ समाजाच्या आरोग्य व अधिकारांसाठी स्थापन केली. ही संस्था २०२१ मध्ये बंद करण्यात आली. २०१९ साली त्यांनी 'बिंदू क्विअर राईट्स फाऊंडेशन (Section 8 Company)' स्थापन केली व ते या कंपनीचे अध्यक्ष आहेत.

## जानेवारी ते मार्च २०२२ मधील कार्य

२२/०१/२०२२ ला, फिरोदिया विधी महाविद्यालयात एलजीबीटीआयकयूए+ या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा भरविण्यात आली होती.

या कार्यशाळेत बिंदुमाधव खिरे, मुंबईचे एलजीबीटीआयकयूए+ सामाजिक  कार्यकर्ते पल्लव पाटणकर, पुण्याच्या सोनाली दळवी इत्यादींची सत्रे झाली.

०५/०२/२०२२ ला ‘संवाद एचआयव्ही/एड्स हेल्पलाइनचा’ पुणे व पटना (बिहार)शाखेच्या हेल्पलाइन ऑपरेटर्ससाठी  एलजीबीटीआयकयूए+ या विषयावरचे सत्र घेतले व हेल्पलाइनवर नेहमी विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे काय व कशी द्यायची यावर चर्चा केली. 'मुक्ता चॅरिटेबल फाऊंडेशन' ही हेल्पलाइन पुण्यात व पटना (बिहार) मधे चालवते.

२४/०२/२०२२ ला यशवंतराव चव्हाण मेमोरियल(YCM) PG हॉस्पिटल (PCMC) मध्ये एलजीबीटीआयकयूए+ विषयावर संवाद आयोजित केला. या संवादाला मानसोपचार विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. मनजीत संत्रे, डॉ. स्मिता पाटणकर, डॉ. रोकडे व इतर डॉक्टर्स, इंटर्न्स उपस्थित होते. पॅनलिस्ट होते- गे तरुण ओंकार शिंदे, ट्रान्समॅन त्रिनय, ट्रान्सवुमन दामिनी सिन्हा व असेक्श्यूयल सुमेध दीक्षित. डॉ. मनजीत संत्रे व बिंदुमाधव खिरे यांनी सूत्रसंचालन केले.

शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय, पुणे यांनी ३ महिन्यांचा “लॉ अँड ऑल्टरनेटिव सेक्श्यूॲलिटीज” या विषयाचा सर्टिफिकेट कोर्स सुरू केला आहे. याच्या उद्घाटनाला मुंबईचे अशोक राव कवी व शोभना कुमार यांची सत्रे झाली. या कोर्समधे, ३ दिवस- ८, ९ व १० मार्च २०२२ ला बिंदुमाधव खिरे यांना 'भादंसं ३७७ कलम', 'समलिंगी विवाह', व ‘एलजीबीटीआयकयूए+ व पोलिस' या तीन विषयांवर सत्र घेण्यास आमंत्रित केले गेले. पुढील काळात- परमेश सहानी, झैनब इत्यादींची सत्रे आयोजित केली आहेत.

१३/०३/२०२२ ला, 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी' च्या व्यक्तिमत्व विकास शिबिरामध्ये कौन्सेलर्स साठी बिंदुमाधव खिरे यांचे एलजीबीटीआयकयूए+ विषयावर दिवसभराचे एक सत्र आयोजित केले होते. या सत्रात ट्रान्सवुमन विजया यांनी अनुभव कथन केले.

२४/०३/२०२२ ला यवत, ता. दौंड, जि. पुणे, येथे ट्रान्सजेंडर ID, प्रमाणपत्र नोंदणी साठी कॅम्प आयोजित केला गेला. दिपा गुरु व स्वयंसेवक अमोल शिंदे यांच्या मदतीने १३ तृतीयपंथीयांनी प्रमाणपत्र व ID साठी अर्ज भरले. या व्यतिरिक्त, आतापर्यंत ५२ ट्रान्सजेंडर्स व ११ ट्रान्समेन यांना ट्रान्सजेंडर प्रमाणपत्र व ID काढून देण्यास मदत केली आहे.



YCM PG हॉस्पिटल (PCMC). डावी कडून: सुमेध दीक्षित (असेक्श्यूयल), त्रिनय गौडा(ट्रान्समॅन), ओंकार शिंदे (गे), मानसोपचार विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. मनजीत संत्रे, एलजीबीटीआयकयूए+ ॲक्टीव्हिस्ट बिंदुमाधव खिरे, प्रा. डॉ. स्मिता पाटणकर, दामिनी सिन्हा(ट्रान्सवुमन) व डॉ. गौरव वडगावकर.

# जिल्हा:  पुणे व पिंपरी-चिंचवड विभाग

## युतक ग्रुप

संस्थापक: अनिल उकरंडे (समलिंगी पुरुष)

## संपर्क

संपर्क क्रमांक: 8459456178
Fb insta page: @yutak.lgbtiq
ई-मेल: ukarandeanil@gmail.com

## माहिती

पिंपरी-चिंचवड शहरामधील आवश्यक असलेली स्पेस निर्माण करण्यासाठी मी, अनिल उकरंडे गेली चार वर्षे 'युतक' नावाचा सपोर्ट ग्रुप चालवत आहे व विविध सुविधा पुरवत आहे (यातील काही सुविधा मोफत दिल्या जातात).

पिंपरी-चिंचवड शहराची वेगळी ओळख आणि गरजा पाहता बिंदुमाधव खिरे यांनी २०१७ मध्ये आयोजित केलेल्या एका 'क्विअर कट्टा' मध्ये पिंपरी-चिंचवड शहराची वेगळी अभिमान पदयात्रा असावी असा एक विचार समोर आला होता. हीच संधी ओळखून मी, पिंपरी-चिंचवड शहरामधे पहिली अभिमान पदयात्रा 2018 मध्ये आयोजित केली. ज्यामध्ये मार्गदर्शन आणि आर्थिक पाठबळ समपथिक ट्रस्ट (आत्ताची बिंदू क्विअर राइट्स फाऊंडेशन) यांनी दिले होते.

1. आमचा सपोर्ट ग्रुप, पिअर कौन्सिलिंग, मानसिक आधार देण्यास मदत करतो तसेच ट्रान्सव्यक्तींना 'जेंडर डिसफोरिया' (GD) सर्टिफिकेट मिळवण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन आणि रेफरल सुविधा देतो.

2. युतक सामाजिक-कायदेशीर (socio-legal) सुविधा पुरवतो. उदा. लिंगबदल शस्त्रक्रिये पूर्वी किंवा नंतर गरजेनुसार कागदोपत्री नाव **बदलणे तसेच** लिंग बदल करण्याकरिता आवश्यक ती मदत देणे, सरकारकडून तृतीयपंथी व्यक्तींना दिले जाणारे प्रमाणपत्र आणि ओळखपत्र बनवून देणे. LGBTIQ फ्रेंडली वातावरणात कामाची संधी शोधून ती मिळवून देणे, कायदेशीर सल्ला इत्यादी.

3. लैंगिक अल्पसंख्याक समाजाबद्दल (LGBTIQ) गैरसमज दूर करण्यासाठी आवश्यक असणारी 'लिंग, लिंगभाव आणि लैंगिक कल' (Sex-Gender-Sexuality) याची माहिती देऊन जनजागृती कार्यक्रम घेण्याचे काम करतो. डिसेंबर 2021 ते मार्च 2022 पर्यंत आम्ही असे 3 कार्यक्रम सातारा व पुणे येथे केले आहेत.

4. LGBTIQA+ अभिमान पदयात्रा: दरवर्षी डिसेंबर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी पिंपरी-चिंचवड शहराची LGBTIQA+ अभिमान पदयात्रा आयोजित केली जाते. Covid-19 लॉकडाऊन नंतर 19 डिसेंबर 2022 रोजी मी, LGBTIQA+ अभिमान पदयात्रा आयोजीत केली. 100 हून अधिक लोकांनी एकत्र येऊन ही अभिमान पदयात्रा पूर्ण केली. मुंबई, इंदोर, कोकण आणि विदर्भ अशा वेगवेगळ्या ठिकाणावरून आलेली नवखी तरुण मुले हे अभिमान पदयात्रेचे वैशिष्ट्य ठरले. अभिमान पदयात्रेसाठी कम्युनिटी कडून एकूण बावीस हजार रुपयांची वर्गणी मिळाली. पदयात्रेचा एकूण जमाखर्च फेसबुक आणि इंस्टाग्राम अकाउंट वरती दिलेला आहे. उरलेली रक्कम माझ्या वैयक्तिक खात्यावर (YUTAK रजिस्टर एनजीओ नाही त्यामुळे आर्थिक व्यवहारासाठी मी वैयक्तिक बँक खाते वापरतो) पुढील वर्षाच्या अभिमान पदयात्रेसाठी फिक्स डिपॉझिट (FD) करून ठेवलेली आहे. या अभिमान पदयात्रेसाठी पोलिस प्रशासन आणि स्वयंसेवक यांची अमोल साथ आम्हाला लाभली. या सर्वांचे मनापासून आभार.

## जानेवारी ते मार्च 2022 मधील कार्य

**एचआयव्ही/एड्स, एआरटी** (HIV/AIDS, ART)**:** या तीन महिन्यांच्या काळामध्ये युतकने नव्याने एचआयव्ही संक्रमित झालेल्या तीन व्यक्तींना राहण्यासाठी आणि एआरटीच्या (Anti Retroviral Therapy) गोळ्या मिळवून देण्यासाठी मदत केलेली आहे. तिन्ही एचआयव्ही संक्रमित व्यक्ती आमच्या संपर्कात आहेत.

**आधार:** जानेवारी 2022 मध्ये आमची एक मैत्रीण जी ट्रान्सवुमन आहे तिने आपली लिंगबदल शस्त्रक्रिया करून घेतल्यानंतर आम्ही जवळ जवळ महिनाभर तिला आमच्या घरी राहण्याची सोय करून दिली होती. हि मदत करायचं कारण ती आपल्या घरापासून दूर राहत आहे आणि शिवाय कोणत्याही गुरू-चेला परंपरेचा भाग नाही.

**प्रमाणपत्र व ओळखपत्र:** 7 ट्रासव्यक्तींना शासनाकडून दिले जाणारे ट्रान्सजेंडर ओळखपत्र आणि प्रमाणपत्र बनवून घेण्यास मदत केलेली आहे. यापैकी 4 ट्रान्समेन आहेत.

**ब्लॅकमेल केसेस** (Blackmail cases): बदललेलं जग आणि डेटिंग ची पद्धत यामुळे दर दोन आठवड्यांनी एखादा तरी असा कॉल असतोच जिथे, तरुण क्लोजेटेड (छुपी) गे, बायसेक्सयुअल आणि ट्रान्सजेन्डर (18-22 वयोगटातील) मुले ब्लॅकमेल किंवा फसवणूक झाल्याची तक्रार करतात- कॉल करून बोलवून घेतलं जातं, पैसे, फोन काढून घेतला जातो, गुंड व्यक्तीकडून मारहाण होते. या तीन महिन्यांमध्ये पाच ते सहा तक्रारी आलेल्या असून त्यापैकी निम्म्या तक्रारी घरी आपल्या लैंगिकतेबद्दल कळेल या भीतीपोटी पोलीस स्टेशन पर्यंत पोचल्या नाहीत. मला दोन प्रकरणे/केसेस आवर्जून नमूद करायच्या आहेत.

१. एका मुलाने वय वर्ष 23 मूळचा विदर्भ इथला असून पुण्यामध्ये एका कंपनी मध्ये काम करतो. डेटिंग App वरून विदेशी व्यक्तीने विवाहाची ऑफर दिल्याने कोणताही मागचा पुढचा विचार न करता या मुलाने 80 हजार रुपये आपले वडील आणि भाऊ यांच्या अकाउंटवरून परस्पर घेऊन या फसव्या जाळ्यात स्वतःला अडकवून घेतले आहे. युतक च्या मदतीने आम्ही ही तक्रार पोलीस आयुक्तालयात नोंदवली आहे याचा तपास सध्या सुरू आहे. पोलिसांनी सांगितले की, "दिलेली रक्कम परत मिळेल अशी खात्री देता येत नाही पण आरोपीला गजाआड करू ".

२. एक छुपा उभयलिंगी (Bisexual) मुलगा वय वर्षे 26 असून डेटिंग Apps वरून त्याचे उघडे नागडे फोटो शेअर होत असल्याची तक्रार घेऊन आला. संबंधित मुलाला ऑनलाइन सायबर तक्रार नोंदवण्यास मदत केली आहे. ही केस सध्या ------ पोलीस स्टेशन मध्ये प्रलंबित आहे.

यावरील केसेस वरुन स्पष्ट आहे की समलिंगी तरुण मुले कोणताही विचार न करता आपल्या हातून अशी संकटं स्वतःवर ओढवून घेत आहेत. या केसेस वाचून तरी सावध व्हा !!!

**क्यू-मीट्स** (Qmeets): दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी आम्ही मंथली मीटिंग म्हणजेच Qmeets घेत असतो. लॉकडाऊन-2 नंतर मंथली मिटींगला येणाऱ्या तरुण व्यक्तींची संख्या वाढलेली आहे. डिसेंबर 2021 मध्ये झालेल्या मीटिंगमध्ये 26 सहभागी होते तर मार्च 2022 मध्ये झालेल्या मीटिंगमध्ये 40 सहभागी असा वाढता आकडा दिसून आला. मार्च 2022 मध्ये झालेल्या मीटिंगमध्ये खेड, जेजुरी, लोणावळा, चाकण, मुळशी अशा दूरवरच्या ठिकाणांवरून तरुण मुले आली

होती. आता या मिटींग्स डेक्कन जवळील छत्रपती संभाजी महाराज बागेमध्ये स्थलांतरित केल्या आहेत.

31 मार्च 2022 हा 'आंतरराष्ट्रीय तृतीयपंथी दर्शिता दिवस' (International transgender day of visibility). या दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकाने ट्रान्सजेन्डर आणि LGBTIQ समाजासाठी काम करणाऱ्या संस्था आणि व्यक्ती यांचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार केला. यामधे युतक सपोर्ट ग्रुपला Covid-१९ महामारीच्या काळात ट्रान्सजेंडर आणि LGBTIQ समाजाला केलेल्या मदतीबद्दल सन्मानित करण्यात आले.

सदरच्या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून सामाजिक न्याय विभाग आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, PCMC चे मुख्य आयुक्त श्री. राजेश पाटील, श्री. जिंतेंद्र वाघ (अती. आयुक्त), श्री. चारठाणकर (समाज कल्याण विभाग) आणि डॉ. काकासाहेब डोळे (पोलीस डेप्युटी कमिशनर) इत्यादी मान्यवर आले होते. पूर्ण कार्यक्रमाची धुरा श्री. सुहास बहाद्दरपुरे यांनी वाहिली.



19 डिसेंबर 2021. पिंपरी चिंचवड समलिंगी, उभयलिंगी, तृतीयपंथी आणि द्विलिंगी अभिमान पदयात्रा.




पुणे क्यू-मीटस्




31 मार्च 2022. डॉ. प्रशांत नारनवरे यांच्या कडून
सन्मान स्वीकारताना अनिल उकरंडे

# जिल्हा: पुणे

## पुणेरी प्राईड फाऊंडेशन

CIN (U85300PN2020NPL194705)

कंपनीचे बोर्ड ऑफ डायरेक्टर्स: प्रसाद गोंदकर, निलेश माझिरे आणि बिपीन दुर्गाइ.

**संपर्क:**

संपर्क क्रमांक: 9822912112 / 8850021870

ई-मेल: team@puneripride.org

वेबसाईट: http://puneripride.org

**माहिती**

पुणेरी प्राईड **फाऊंडेशन** हि कंपनी ऍक्ट २०१३ अंतर्गत रजिस्टर सेकशन ८ कंपनी आहे. समाजातील समलैंगिक (LGBTQ) आणि किन्नर वर्गाचे सामाजिक कल्याण करण्याच्या उद्देशाने पुणेरी प्राईड फाऊंडेशन कंपनीची स्थापना ०७/१०//२०२० रोजी करण्यात आली.

समलैंगिक आणि किन्नर वर्गाला जे दैनंदिन जीवनात अडथळे निर्माण होतात ते दूर करण्याचे काम पुणेरी प्राईड फाऊंडेशन हि कंपनी करते. किन्नरवर्गातील व्यक्तींचे आधार कार्ड, पॅनकार्ड, ट्रान्सजेन्डर सर्टिफिकेट्स बनवणे, त्यांच्यासाठी विविध उपजीविकेच्या व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, सरकारी योजनांचा लाभ मिळवून देणे, त्यांच्यातील कलागुण ओळखून त्यावर आधारीत प्रशिक्षण उपलब्ध करून देणे, त्यांच्या शिक्षणासाठी कॉलेज फीज उपलब्ध करून देणे, अशी उद्दिष्टये समोर ठेऊन पुणेरी प्राईड फाऊंडेशन हि कंपनी कार्यरत आहे. कंपनी विविध उपक्रम राबवते ज्या मध्ये 'क्विअर टॉकस्', 'कल्याण मेळावे', संवेदनशीलता सत्रे, वकिली मंचात सहभाग, सरकारी आणि निम्नसरकारी कंपन्यांच्या बरोबर जोडून काम करणे, इत्यादि.

## जानेवारी ते मार्च २०२२ मधील कार्य

५ जानेवारी २०२२ रोजी पुणेरी प्राईड फाऊंडेशन तृतीयपंथीयांना रेशन किट्स, ब्लँकेट्स आणि साडी यांचे वाटप केले, २१ फेब्रुवारी २०२२ रोजी पन्नास तृतीयपंथीयांचे ट्रान्सजेन्डर सर्टिफिकेट्स बनवून वाटप केले.

३१ मार्च २०२२ रोजी 'इंटरनॅशनल ट्रान्सजेन्डर व्हिजिबिलीटी डे' च्या निमित्ताने सेक्स वर्कर्स, समलैंगिक आणि तृतीयपंथीयांचा 'विविध गुणदर्शन' कार्यक्रम केला. याच्याअंतर्गत नृत्य, गायन, वादन, मेहेंदी काढणे, 'मेकअप डेमो' दाखवणे, खाण्याचे पदार्थ बनवणे इत्यादी कला सादर करण्यात आल्या. या कार्यक्रमाला अंदाजे १०० सेक्स वर्कर्स, समलैंगिक आणि तृतीयपंथी उपस्थित होते.

'सहेली संघा'तर्फे 'कायदा' याविषयी नाटिका सादर केली, तसेच सहेली संघातर्फे राबवण्यात येणाऱ्या 'क्लीनरेड' प्रकल्पातील महिलांना सर्टिफिकेट देऊन त्यांचा गौरव करण्यात आला तसेच सर्व सहभागी कलाकारांना सर्टिफिकेट्स आणि गौरवचिन्हे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाची सांगता अल्पोपहार देऊन करण्यात आली.

या कार्यक्रमामध्ये 'सहेली संघ', 'अखिल बुधवारपेठ देवदासी संस्था', 'वंचित विकास संस्था', 'पुणेरी प्राईड फाऊंडेशन', 'अभिजीत जोशी मेमोरियल फाऊंडेशन', 'सहारा प्रॉडक्शन हाऊस' आणि 'मिडास टच हेअर अँड ब्युटी इंटरनॅशनल इन्स्टिटयूट' यांनी सहभाग घेतला. 'अभिजीत जोशी मेमोरियल फाऊंडेशन', 'सहारा प्रॉडक्शन हाऊस' आणि 'मिडास टच हेअर अँड ब्युटी इंटरनॅशनल इन्स्टिटयूट' यांनी आर्थिक सहाय्य दिले.




राशन किट वाटप




तृतीयपंथी ID व प्रमाणपत्र वाटप



इंटरनॅशनल ट्रान्सजेन्डर व्हिजिबिलीटी डे

# जिल्हा:  पुणे

## श्री महालक्ष्मी सामाजिक संस्था (धानोरी, पुणे)

संस्थापक, अध्यक्ष लखनभाऊ ओव्हाळ

## जानेवारी ते मार्च 2022 मधील कार्य

११ जानेवारी २०२२- श्री महालक्ष्मी सामाजिक संस्था (धानोरी, पुणे) व महालक्ष्मी जनजोगती तृतीयपंथ सामाजिक ट्रस्ट (लोहगाव, पुणे) यांनी आळंदी (पुणे) येथे ब्लँकेट व खाऊ वाटपाचा कार्यक्रम केला. या कार्यक्रमाला लखन गुरु, संजय टाकळकर, साजन अन्सारी, कीर्ती टाकळकर, सोमनाथ ढोबळे, कामिनी पवन सिंग, गयाबाई ओव्हाळ, अर्चना देवकर इत्यादी उपस्थित होते. .




ब्लँकेट व खाऊ वाटप कार्यक्रमास उपस्थित जन



१५ जानेवारी २०२२ चा 'हळदी कुंकू' कार्यक्रम
डावीकडे लखन गुरु

जाहिरात (Advt.)

## **नमस्ते LGBTIQA**

**ब्रिजस्टोन इंडिया** यह एक टायर मैन्युफैक्चरिंग कंपनी है

जिनके सामाजिक दायित्व के अंतर्गत हम **"सारथी"** यह इनीशिएटिव चला रहे हैं

जो कि एक कमर्शियल ड्राइवर ट्रेनिंग प्रोग्राम है, फॉर हेवी मोटर व्हीकल (HMV and LMV)

इसकी विशेषताएं नीचे दिए गए पेंपलेट में दर्ज है |

अगर आप इस ट्रेनिंग में जोकि **एकदम निशुल्क हैं** इसमें रुचि रखते हैं तो कृपया इस पेंपलेट में दिए गए नंबर से आप संपर्क कर सकते हैं | या फिर नीचे दिए गए नंबर से संपर्क करें |

**नाम: मिस्टर मनोज दास (सेक्शन मैनेजर सीएसआर) ब्रिजस्टोन इंडिया. संपर्क क्रमांक: 509509411**



# जिल्हा: सांगली

**अनुभवकथन:** अजित (तासगाव. जि. सांगली)

तासगाव (जि. सांगली) तालुक्यातही 'ग्रींडर' ॲपचा वापर खूप तरुण मुले करतात. इकडे बहुतेकजण आऊट नसल्याने सगळं छुपेपणाने चालतं. याचा गैरफायदा काही तरुण मुलं ब्लॅकमेलिंग साठी करतात.

एकदा मी ॲपवर एका मुलाला एकांतात भेटलो. आमच्यामध्ये काही झाले नाही. “मला तू आवडला नाहीस." असे मी त्याला सांगितले.

त्यावर तो मला “मी पेड आहे, माझे पैसे दे, नाहीतर मी तुझी बदनामी करेन." असं म्हणाला. मी घाबरलो नाही. "पेड आहेस हे आधी सांगितलं होतंस का? आणि बदनामी करायची? चल आता रस्त्यावर. तू माझी कर आणि मी पण तुझी करतो." असं मी त्याला म्हणालो. मग मात्र तो तिथून निघून गेला.

इथे मला नमूद करायचे आहे की, छोट्या गावातही असे ब्लॅकमेलिंगचे प्रकार घडतात. म्हणून सर्वांनी सावध असणं गरजेचं आहे.

**अनुभवकथन:** राहुल शिंदे (जि. सांगली)

राहुल शिंदे, शिक्षक आहे. माहेर, मेनका, लोकप्रभा अशा मासिकांत आणि दिवाळी अंकात लेखन करतो अज्ञात नावाचा कथासंग्रह प्रकाशित.

१) हा अनुभव २०२० मधला आहे. सेक्सोलॉजिस्ट ------------- यांच्याकडे मी पुणे येथे गेलो होतो. त्यांना माझे शारीरिक आणि मानसिक आकर्षण मुलांकडे असल्याबद्दल सांगितले.माझी संपूर्ण हिस्टरी आणि अनुभव ऐकून न घेता ते मला म्हणाले:

"याला तर दुरुस्त करणे गरजेचे आहे. तुला बायसेक्सयुअल बनावं लागेल, तरच तू मुलीशी लग्न करू शकशील.मी तुला गोळ्या देतो". त्यांच्या अशा बोलण्याने मी अस्वस्थ झालो आणि आपण समुपदेशनासाठी चुकीच्या डॉक्टरकडे आलो आहे याची जाणीव झाली.कधी एकदा तिथून बाहेर पडू,असे झाले. "मला गोळ्या नकोत.मी निघतो." मी म्हणालो आणि त्यांनी २००० रुपये  एवढी फी सांगितली. मला आश्चर्यच वाटले."एवढे पैसेच नाहीत माझ्याकडे."असं मी म्हणून शेवटी फक्त ५०० रुपये देऊन तिथून बाहेर पडलो.

२) हा अनुभव 2021 मधला आहे. मिरजेचे एक होमिओपॅथी डॉक्टर आहेत. त्यांना मी घरच्यांसोबत भेटून मी समलिंगी असल्याबद्दल सांगितले. तेव्हा त्यांनी मला काही गोळ्या दिल्या आणि मला म्हणाले, "काही विचार न करता या गोळ्या घे.सगळं ठीक होईल. आणि तुझ्या हातातही बरंच काही आहे.मुलींबद्दल विचार कर.." असं त्यांनी काही काही समजावले. नंतर लवकरच "त्याचं आकर्षण मुलींकडे होईल." असं माझ्या घरचांना समजावले.

३) सांगलीला डॉक्टर समीर गुप्ते हे प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ आहेत. त्यांच्यासोबतचा अनुभव सकारात्मक आहे. २०२० साली त्यांना भेटून मी समलिंगी आहे,असे सांगितले. त्यांनी संपूर्ण हिस्टरी जाणून घेतली.त्यानंतर त्यांनी माझ्या वडिलांना आणि मामांना अगदी सोप्या शब्दात सांगितले, "हा कसलाही आजार नसून हे नैसर्गिक आहे.पुढे जाऊन मुलीशी लग्न केल्यास अनेक अडचणी येतील.जशी झाडं वेगवेगळ्या प्रकारची असतात. तसं निसर्गाने निर्माण केलेली समलैंगिकता ही नैसर्गिक गोष्ट आहे.यावर कुठलेही औषध नाही."

# जिल्हा:  सातारा

**युतक ग्रुप** (पुणे व पिंपरी-चिंचवड विभाग)
संस्थापक: अनिल उकरंडे (समलिंगी पुरुष)

**संपर्क:**
संपर्क क्रमांक: 8459456178
Email: ukarandeanil@gmail.com
Fb insta page: @yutak.lgbtiq

**कार्य**
दिनांक 29 डिसेंबर 2021 ला, “लिंग, लिंगभाव, व लैंगिकता” विषयावर अनिल उकरंडे यांनी “यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ सोशल वर्क”, सातारा येथे पदवी आणि पदव्युत्तर (BSW व MSW) विद्यार्थ्यांची कार्यशाळा घेतली. एकूण 73 विद्यार्थी या कार्यशाळेला उपस्थित होते.




“यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ सोशल वर्क” (सातारा) येथील कार्यशाळेतील सहभागी विद्यार्थी.

# जिल्हा: सोलापूर

## निरायम आरोग्य धाम

### संपर्क

व्यवस्थापक: श्री.शिवाजी शिंदे
संपर्क क्रमांक: मो- 9860156270, ऑफिस- 0217-2326264
ई-मेल: nadti2msm799@gmail.com

लेखक: श्री.शिवाजी शिंदे व प्रदीप पाटील

### माहिती

निरायम आरोग्य धाम (NAD) ही संस्था समलिंगी पुरुष आणि तृतीयपंथी समुदाय यांची सामाजिक सुरक्षितता, आरोग्य, शिक्षण व समुपदेशन सेवा-सुविधांसाठी काम करते. या संस्थेची स्थापना 1991 साली झाली. संस्थेचे अध्यक्ष, श्री.भालचंद्र किणीकर आहेत व संचालिका, आ. श्रीमती सीमा किणीकर आहेत. निरायम आरोग्य धाम (NAD) सोलापूर जिल्ह्यात शरीर विक्री करणाऱ्या स्त्रिया(FSW), पुरुषांशी शरीर संबंध  करणारे पुरुष (MSM), तृतीयपंथी, HIV संसर्गित व्यक्तींसाठी काम करते. या समाजाचे आरोग्य, अधिकार, शिक्षण या कार्यक्रमांवर संस्थेचा भर आहे.





मा. डॉ. भालचंद्र किणीकर अध्यक्ष 'निरामय आरोग्य धाम',  संचालिका मा. श्रीमती सीमा किणीकर

## जानेवारी ते मार्च २०२२ मधील कार्य

दि. ०५/०२/२२ रोजी 'NAD' मध्ये 'तृतीयपंथी प्रमाणपत्र व ओळखपत्र' वितरण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर शहर पोलीस आयुक्त मा. हरीश बैजल यांना निमंत्रित केले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे सपत्नीक उपस्थित होते. मा. डॉ. भालचंद्र किणीकर (निरामय आरोग्य धाम- अध्यक्ष, सोलापूर), संचालिका आ. श्रीमती सीमा किणीकर, प्रकल्प व्यवस्थापक शिवाजी शिंदे, NAD स्टाफ व तृतीयपंथी उपस्थतीत होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सीमा किणीकर मॅडम यांनी केले. मा. श्री. हरीश बैजल साहेब (पोलीस आयुक्त, सोलापूर) आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की “पोलीस आयुक्त असल्यामुळे मी वेगवेगळ्या कार्यक्रमास उपस्थित राहतो परंतु आजचा हा कार्यक्रम आगळा वेगळा कार्यक्रम आहे. ह्या कार्यक्रमात तुम्ही मला बोलवले याकरिता मी सीमा किणीकर मॅडम व तुमच्या सर्व तृतीयपंथीयांचा आभारी आहे. मी तृतीयपंथीयांचे प्रश्न व अडचणी समजून घेतल्या. आज समाजात वावरत असताना तुम्हाला वेगळ्या दृष्टिकोनातून पाहत असतील, पण एक मदतीचा हात म्हणून मी आवाहन करतो, की ज्यांना 'पोलीस पेट्रोल पंपा'वर नोकरी करायची त्यांना मी नोकरी देण्याचे आश्वासन देतो”.

या कार्यक्रमात ६० तृतीयपंथी लाभार्थींना तृतीयपंथी ID व प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन रमेश वाघमारे (NAD–MSACS–TI-2 CC, सोलापूर ORW) यांनी केले.

दि. १०/०२/२२ रोजी पोलीस आयुक्तांनी अशा इच्छुक उमेदवारांना व NAD व्यवस्थापकांना 'स्वगृही' बोलावले व दोघांना प्रातिनिधिक स्वरूपात शहर पोलीस पेट्रोल पंपावर कामाची संधी दिली व तशी ऑर्डर काढली.

दि. १९/०२/२२ रोजी सकाळी पेट्रोल पंपाजवळच या उमेदवारांच्या सत्कारासाठी मा. पोलीस आयुक्तांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी तथा जिल्हा तृतीयपंथी कल्याण समिती, सोलापूर चे अध्यक्ष मा.मिलिंद शंभरकर प्रमुख अतिथी होते. तसेच महानगरपालिका आयुक्त मा.पी.शिवशंकर, पोलीस आयुक्त मा. हरीश बैजल, पो. उपायुक्त वैशाली कडुकर, पो. उपायुक्त दीपाली घाटे, पो.उपायुक्त मा. बापूजी बांगर तसेच अन्य पोलीस अधिकारी व कर्मचारी, NAD च्या संचालिका आ.श्रीमती सीमा किणीकर व स्टाफ आणि तृतीयपंथी उपस्थित होते. एकंदर संपूर्ण जिल्हा प्रशासन, महानगरपालिका, पोलीस प्रशासन तृतीयपंथींच्या सामाजिक सुरक्षा व कल्याणासाठी कटिबद्ध असल्याचे मान्यवरांनी सांगितले. कार्यक्रमास 'निरामय आरोग्य धाम'चे अध्यक्ष डॉ. भालचंद्र किणीकर यांची विशेष उपस्थिती होती.




'निरामय आरोग्य धाम'च्या संचालिका आ. श्रीमती सीमा किणीकर प्रास्ताविक करताना




मा. श्री. हरीश बैजल साहेब (पोलीस आयुक्त ,सोलापूर) यांच्या शुभहस्ते

तृतीयपंथी प्रमाणपत्र वाटप करताना




तृतीयपंथी प्रमाणपत्र वाटप




पेट्रोल पंपाजवळ दोन तृतीयपंथी नवीन कामगारांचा सत्कार



तृतीयपंथी नवीन कामगारांचा पहिला दिवस




होर्डिंग

# जिल्हा: वर्धा

## कनव्हर्जन थेरपी वर बंदी व वैद्यकीय अभ्यासक्रम-LGBTIQA+ समावेशक करणे

लेखक: बिंदुमाधव खिरे



डॉ. इंद्रजित खांडेकर

[सुषमा व इतर वि. कमिशनर ऑफ पोलीस व इतर] (WP 7284 of 2021). मद्रास उच्च न्यायालय) च्या केस मध्ये, माननीय मद्रास उच्च न्यायालयाने आदेशात सांगितले की 'कनव्हर्जन थेरपी' (समलिंगी व्यक्तींना भिन्नलिंगी बनवण्याचे प्रयत्न करणं, ट्रान्सजेंडर/तृतीयपंथी यांचा लिंगभाव बदलण्याचा प्रयत्न करणं (उदा. समुपदेशन, औषधं, अघोरी उपचार करून) यावर बंदी आणावी. तसेच वैद्यकीय अभ्यासक्रमात बदल करून तो LGBTIQA+ समावेशक व संवेदनशील बनवण्यात यावा.

या आदेशानुसार, राष्ट्रीय वैद्यकीय आयोगानी (नॅशनल मेडिकल कमिशन- NMC) पाच तज्ज्ञांची समिती स्थापन केली. या समितीत डॉ. विजयेंद्र कुमार (अध्यक्ष), डॉ. प्रभा चंद्रा, डॉ. सुरेखा किशोरे, डॉ. इंद्रजित खांडेकर व डॉ. सुरभी शर्मा आहेत. महाराष्ट्रासाठी अभिमानाची

गोष्ट म्हणजे वर्ध्याच्या ‘महात्मा गांधी इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस’ (सेवाग्राम) च्या फॉरेन्सिक मेडिसिनचे प्राध्यापक डॉ. इंद्रजित खांडेकर या समितीतले एक सदस्य आहेत.

या समितीने अभ्यास करून, वैद्यकीय अभ्यासक्रम LGBTIQA+ समावेशक करण्याबद्दल सूचना तयार केल्या. त्याच बरोबर ‘कनव्हर्जन थेरपी’ करणं हे इंडियन मेडिकल कौन्सिल (IMA) Professional Conduct, Etiquette and Ethics Regulation, 2002 नुसार ‘अनएथिकल कन्डक्ट’ व ‘प्रोफेशनल मिसकन्डक्ट’ घोषित करण्यात यावे अशी शिफारस केली आहे. फेब्रुवारी २०२२ मध्ये या शिफारशी मद्रास उच्च न्यायालयासमोर मांडण्यात आल्या. या शिफारशींवरून, NMC राज्य वैद्यकीय परिषद (State Medical Council) तसे आदेश काढतील ही अपेक्षा आहे .

सर्व समिती सदस्यांचे मनापासून आभार. विशेषत: डॉ. इंद्रजित खांडेकरांचे कारण त्यांच्या NMC च्या तज्ज्ञ समितीच्या कामाबरोबरच, त्यांचा माझ्या (बिंदुमाधव खिरे ) कामाला खूप खूप पाठिंबा आहे .

**टिपणी:** या तज्ज्ञ समितीला काही सूचना पुण्याचे मानसोपचारतज्ज्ञ डॉ. भूषण शुक्ल व LGBTIQA+ ॲक्टिविस्ट बिंदुमाधव खिरे यांनी पाठवल्या. त्याचा उल्लेख माननीय मद्रास उच्च न्यायालयात दाखल केलेल्या दस्तऐवजात आहे.




BINDU
QUEER RIGHTS
FOUNDATION

बिंदू क्विअर राइट्स फाऊंडेशन